# जीएसटीमुळे विकासदर वाढेल

## डॉ. गुरव : वस्तू व सेवा कर विभागातर्फे कार्यक्रम

रमणमळा, ता. २ : 'जी.एस.टी. मुळे भविष्यात काही वस्तूंच्या किमती कमी होतील, त्याचबरोबर जी.डी.पी मध्ये निश्चित वाढ होणार आहे,' असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे वाणिज्य विभागप्रमुख डॉ. अण्णासाहेब गुरव यांनी केले. वस्तू व सेवा कर विभागाच्या वतीने आज 'वस्तू व सेवा कर' दिन साजरा करण्यात आला.




**रमणमळा : जीएसटी दिन कार्यक्रमाचे उद्‌घाटन करताना डॉ. अण्णासाहेब गुरव. शेजारी केंद्रीय वस्तू व सेवा कर उपायुक्त धनंजय कदम, राज्य कर सहआयुक्त रेश्मा घाणेकर, उपायुक्त वैशाली काशीद.**

केंद्रीय वस्तू व सेवा कर उपायुक्त धनंजय कदम, राज्य करसहआयुक्त रेश्मा घाणेकर, उपायुक्त वैशाली काशीद उपस्थित होते. रमणमळा परिसरातील जीएसटी कार्यालयाला विद्युत रोषणाई करण्यात आली. रांगोळीने जीएसटीचे प्रबोधन केले होते. दुपारी कार्यक्रमात डॉ. गुरव म्हणाले,'' एकच कर प्रणालीमध्ये मनुष्य संसाधन, मटेरिअल,मार्केट या सर्व घटकांचा चांगल्या प्रकारे वापर करण्यासाठी जी.एस.टी. अंमलबजावणी सुरु झाली आहे.''

सहआयुक्त घाणेकर म्हणाल्या, ''परताव्याबाबतचे व्यापाऱ्यांची समस्या सोडविण्यासाठी मी कटिबद्ध आहे. काही अडचणी असल्यास मेलवरुन आमच्याकडे संपर्क करा. त्या सोडविण्यासाठी निश्चितपणे पाठपुरावा केला जाईल.''

उपायुक्त कदम, महाराष्ट्र चेंबर्स ऑफ कॉमर्सचे उपाध्यक्ष ललीत गांधी, कोल्हापूर जिल्हा चेंबर्स ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष संजय शेटे, कोल्हापूर हॉटेलमालक संघटना, अध्यक्ष उज्ज्वल नागेशकर, कागल पंचतारांकित एमआयडीसी उद्योजक संघटनेचे अध्यक्ष हरिशचंद्र धोत्रे, किराणा भुसारी संघटनेचे अध्यक्ष प्रदीप कापडिया, चार्टड अकांऊटंट असोसिएशनचे चेतन ओसवाल, कोल्हापूर हॉटेलमालक संघटनेचे सेक्रेटरी सिध्दार्थ लाटकर, इंजिनिअरिंग असोसिएशनचे सचिव प्रदीप व्हरांबळे, शिरोली मॅन्युफॅक्चरिंग असोसिएशनचे अध्यक्ष राजू पाटील आदींनी यावेळी मनोगत व्यक्त करुन शुभेच्छा दिल्या.

उत्कृष्ट काम करणाऱ्या अधिकारी, कर्मचारी यांचा यावेळी सत्कार करण्यात आला. उपायुक्त वैशाली काशीद यांनी प्रस्ताविक केले. सहायक आयुक्त स्वाती पाटील यांनी सर्वांचे आभार मानले.

# प्रवेश प्रक्रियेची दुसरी फेरी सुरू

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील विविध अधिविभागातील पदव्युत्तर पदवीच्या पहिल्या व दुसऱ्या वर्षातील प्रवेश प्रक्रियेच्या दुसऱ्या फेरीस दोन जुलैपासून सुरूवात झाली. याअंतर्गत दाखल झालेल्या अर्जांची तपासणी करण्यात येणार आहे. एमफिल व पीएचडीसाठी ऑनलाइन अर्ज करण्याची प्रक्रिया ५ जुलैपासून तर पीजी डिप्लोमासाठी १२ जुलैपासून अर्ज करण्याची प्रक्रिया सुरू होणार आहे.

२७ जूनपासून शिवाजी विद्यापीठातील विविध अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेला सुरूवात झाली. पहिल्या टप्प्यात अर्ज, प्रवेश शुल्क भरण्याची प्रक्रिया पूर्ण झाली. व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रथम वर्षाच्या प्रवेश प्रक्रियेतंर्गत येत्या आठवड्यात तात्पुरती निवड यादी जाहीर होणार आहे. त्यानंतर पहिली व दुसरी यादी प्रसिद्ध करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. अंतिम गुणवत्ता यादी जुलैच्या तिसऱ्या आठवड्यात जाहीर होणार असून त्यानंतर प्रवेश निश्चितीसाठी विद्यार्थ्यांना नोटीस काढण्यात येणार आहे.

# विद्यापीठात ४०० रोपे लावण्याचे उद्दिष्ट

**कोल्हापूर / प्रतिनिधी :** राज्य शासनाच्या ३३ कोटी वृक्ष लागवड मोहिमेसंदर्भातील आवाहनाला प्रतिसाद देत शिवाजी विद्यापीठाने सोमवारी विद्यापीठ परिसरात वृक्ष लागवड मोहिमेला प्रारंभ केला. विद्यापीठात ४०० रोपे लावण्यात येणार आहेत. प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते या वृक्षारोपण मोहिमेस प्रारंभ करण्यात आला.

विद्यापीठाच्या मेघनाद नागेशकर क्रीडा संकुल परिसरात प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते कडुलिंब रोप लागवड मोहिमेचे उद्घाटन करण्यात आले. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, आंतरविद्याशाखीय अधिष्ठाता डॉ. पी.डी. राऊत, क्रीडा अधिविभाग प्रमुख डॉ. पी. टी. गायकवाड, राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक डॉ. डी. के. गायकवाड, उद्यान विभागाचे उपकुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, अधीक्षक ए. के. जाधव यांच्यासह अधिकारी, कर्मचारी, विद्यार्थी, विद्यार्थिनी तसेच सकाळी फिरावयास येणाऱ्या नागरिकांनीही वृक्षारोपण मोहिमेत सहभाग घेतला.


# हवा, ध्वनी प्रदूषण टाळायलाच हवे

प्रा. डॉ. पी. डी. राऊत
पर्यावरणशास्त्र विभागप्रमुख,
शिवाजी विद्यापीठ



कोल्हापूर : हिंदू धर्मियातील सण, उत्सव हे ऋतूप्रमाणित आहेत. निसर्ग, पशूपक्षी, शेती यांच्याविषयी एक पूज्यभाव आणि कमालीची आस्था आहे. झाडाविषयीचे प्रेम व्यक्त करणारी वटपौर्णिमा, बैलाविषयी आपुलकी व्यक्त करणारा सण म्हणजे बैलपोळा, श्रावण महिन्यात तर सणांची मालिका असते. साधारणपणे जून महिन्यापासून सण, उत्सवाला सुरुवात होते. एकानंतर एक सण साजरे होतात. सण, उत्सव हे पर्यावरणपूरक साजरे झाल्यास हवा, ध्वनी, पाणी प्रदूषण टाळता येऊ शकते. प्रदूषण टाळणे म्हणजे निसर्ग संवर्धन, पर्यावरण संतुलन राखण्याचे काम आहे.

गणपती हे सर्वसामान्यांचे दैवत आहे. समाजातील सर्वच घटक गणेश उत्सव मोठ्या भक्तिभावाने साजरा करतात. उत्सव घरगुती स्वरुपाचा असो की सार्वजनिक तो साजरा पर्यावरणपूरकता जपली पाहिजे. पर्यावरणपूरक उत्सव




साजरा करण्यांची संख्या मोठी आहे. वपर्यावरणाला धक्का बसणार नाही याची दक्षता अनेकजण घेतात. पर्यावरण संवर्धनाच्या कामाला व्यापकता लाभली तर साऱ्यांसाठी उपयुक्त ठरणारे आहे.



पूर्वी शाडूपासून गणेशमूर्ती बनविल्या जात. शाडू पाण्यात विरघळायचा. गेल्या काही वर्षात प्लास्टर ऑफ पॅरिसपासून गणेशमूर्ती तयार केल्या जातात. शाडूची मूर्ती बनवायला मेहनत लागते. त्यामानाने प्लास्टर ऑफ पॅरिसची मूर्ती बनवायला सोपी. मात्र प्लास्टर घट्ट झाले तर पाण्यात मिसळत नाही. वितळत नाही. शिवाय मूर्तीवरील रंग हे पाण्यात मिसळतात. अन्नसाखळीत उतरतात. रासायनिक रंगापासून जलचरांना धोका पोहचण्याची शक्यता आहे.

उत्सवाच्या कालावधीत हवा व ध्वनी प्रदूषण रोखण्याला प्राधान्य हवे. गणेशमूर्ती आगमन व विसर्जन मिरवणुकीदरम्यान मोठ्या प्रमाणात फटाक्यांची आतषबाजी होते. मोठा आवाज ध्वनी प्रदूषणाला कारणीभूत ठरतो. शाळा, हॉस्पिटल परिसरातून मिरवणूक काढताना संबंधित घटकांना त्रास होणार नाही याची जाणीव असायला हवी. फटाक्यामध्ये शिसे जास्त प्रमाणात असते. त्याचा परिणाम मेंदूवर होतो.

फटाक्यामध्ये कार्बनडाय ऑक्साइड व कार्बन मोनो ऑक्साईड असते. या दोन्ही घटकांच्या प्रमाणात वाढ झाल्यास हवेतील उष्णता वाढते. परिणामी तापमानात वाढ होते. वातावरणातील बदलाला हे सारे घटक परिणामकारक ठरत आहेत. उत्सव, सण साजरे करत असताना पर्यावरणाला हानी पोहचणार नाही, प्रदूषणात वाढ होणार नाही याची काळजी घेऊन उत्सव साजरे व्हायला हवेत. पर्यावरणपूरक उत्सव साजरे होण्यातही एक प्रकारचे पावित्र्य असते. सण, उत्सव साजरे करण्यात पूर्वजांचा वेगळा दृष्टिकोन होता. पूर्वीच्या कालावधीत निसर्गाला हानीकारक ठरेल, अशा पद्धतीने उत्सव कुणी साजरा करत नसे. उत्सवाची परंपरा जपताना पर्यावरणाची जोड दिल्यास ते साऱ्यासाठी उपयुक्त ठरेल.

- सण, उत्सव हे ऋतूप्रमाणित आहेत
- निसर्ग, पशूपक्षी याविषयी पूज्यभाव व आस्था
- प्लास्टर पाण्यामध्ये मिसळत नाही, रंगाचा जलचरांना धोका
- फटाक्यात शिसाचे प्रमाण जास्त, त्याचा मेंदूवर परिणाम होता
- कार्बनडाय ऑक्साइड व कार्बन मोनो ऑक्साइडमुळे उष्णतेत वाढ
- नैसर्गिक स्रोतांवर परिणाम, वाढते प्रदूषण बदलत्या वातावरणास कारणीभूत



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात वृक्षारोपणप्रसंगी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, डॉ. पी. डी. राऊत, डॉ. डी. के. गायकवाड, डॉ. पी. टी. गायकवाड, डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्यासह शिक्षक, अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थी.

# विद्यापीठात ४०० रोपे लावण्याचे उद्दिष्ट

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

राज्य शासनाच्या ३३ कोटी वृक्ष लागवड मोहिमेसंदर्भातील आवाहनाला प्रतिसाद देत शिवाजी विद्यापीठाने सोमवारी विद्यापीठ परिसरात वृक्ष लागवड मोहिमेला प्रारंभ केला. विद्यापीठात ४०० रोपे लावण्यात येणार आहेत. प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते या वृक्षारोपण मोहिमेस प्रारंभ करण्यात आला.

विद्यापीठाच्या मेघनाद नागेशकर क्रीडा संकुल परिसरात प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते कडुलिंब रोप लागवड मोहिमेचे उद्घाटन करण्यात आले. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, आंतरविद्याशाखीय अधिष्ठाता डॉ. पी.डी. राऊत, क्रीडा अधिविभाग प्रमुख डॉ. पी. टी. गायकवाड, राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक डॉ. डी. के. गायकवाड, उद्यान विभागाचे उपकुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, अधीक्षक ए. के. जाधव यांच्यासह अधिकारी, कर्मचारी, विद्यार्थी, विद्यार्थिनी तसेच सकाळी फिरावयास येणाऱ्या नागरिकांनीही वृक्षारोपण मोहिमेत सहभाग घेतला.


# ‘सद्य:स्थितीत सायबर सुरक्षा काळाची गरज’

## विवेकानंद कॉलेजमध्ये ‘एफडीपी’चे उद्‌घाटन

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

‘आजचे युग माहिती तंत्रज्ञानाचे आहे. बदलत्या काळात तंत्रज्ञान झपाट्याने बदलत आहे. समाजमाध्यमांची सुरक्षा धोक्यात आली आहे. सायबर क्राइम व हॅकिंग माध्यमातून फसवणुकीचे अनेक गैरप्रकार पुढे येत आहेत. त्यामुळे सायबर व डेटाबेस सुरक्षितता काळाची गरज बनली आहे,’ असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे प्रकुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले.

पंडित मदमोहन मालवीय रिसर्च सेंटर व शिवाजी विद्यापीठाच्या अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाच्यावतीने ‘सायबर सिक्युरिटी अँड डाटा सायन्सेस’ या विषयावर विवेकानंद कॉलेजमध्ये आयोजित सहादिवसीय फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्रॅम (एफडीपी) च्या उद्‌घाटनप्रसंगी ते बोलत



डी. टी. शिर्के

होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर होते.

डॉ. एस. वाय. होनगेकर म्हणाले, ‘आज ऑनलाइनच्या युगात मनुष्य रोजच्या जीवनात क्रेडिट कार्ड, डेबिट कार्ड, एटीएम कार्ड, ऑनलाइन बँकिंगच्या माध्यमातून लाखो रुपयांचे व्यवहार करतो. परंतु यासाठी कोणत्याही प्रकारची सुरक्षितता तो बाळगत नाही. ही सायबर सुरक्षा केवळ वेगवेगळ्या क्षेत्रांत काम करणाऱ्या नोकरदार, व्यावसायिक व विद्यार्थ्यांना उपयोगी आहे.’

शिवाजी विद्यापीठांतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्व्यक प्रा. डॉ. आर. के. कामत यांनी फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्रॅमचे महत्त्व सांगितले. यावेळी अनिकेत बदामे, अमोल बागल यांनी मार्गदर्शन केले. प्रा. समीक्षा फराकटे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. एस. आर. कट्टीमनी यांनी आभार मानले.